# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प रि प त्र क

कार्यालयातील सर्व प्रशासकीय अधिकारी व सेवकांना आदेशान्वये कळविण्यात येते की, सर्व प्रशासकीय अधिकारी व सेवकांची वेतनवाढ जुलै महिन्याच्या वेतनामधून काढण्यात येते. त्याप्रमाणे यावर्षीची वेतनवाढ जुलै महिन्याच्या वेतनामधून काढण्यात येणार आहे. वर्ग १, २, ३ व ४ मधील सर्व प्रशासकीय अधिकारी व सेवकांनी खालील वेळापत्रकानुसार मुख्य इमारत, आस्थापना विभाग खोली क्र. २३२ मध्ये येऊन स्वत:च्या सेवापुस्तकामध्ये स्वाक्षरी करावयाची आहे.

सदर कालावधीमध्ये आस्थापना विभागामध्ये येऊन स्वत:च्या सेवापुस्तकामध्ये सही करण्याची व तद्अनुषंगिक जबाबदारी सर्व संबंधित अधिकारी व सेवकांची राहील. ज्या अधिकारी व सेवकांची स्वाक्षरी होणार नाही, अशा अधिकारी व सेवकांची वेतनवाढ काढण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

| अ. क्र. | प्रशासकीय अधिकारी/सेवकांचे पदनाम | सेवापुस्तकावर स्वाक्षरी करण्याचा दिनांक |
|---|---|---|
| १ | वर्ग १ मधील सर्व अधिकारी व अधीक्षक | दिनांक १५ व १६ जुलै, २०२२ |
| २ | सहाय्यक अधीक्षक, वरीष्ठ सहाय्यक व कनिष्ठ सहाय्यक | दिनांक १८ व २० जुलै, २०२२ |
| ३ | तांत्रिक व अतांत्रिक पदे व वर्ग ४ मधील सर्व सेवक | दिनांक २१ व २२ जुलै, २०२२ |

प्र—कुलसचिव

जा.क्र.आस्थापना/ 1526

दिनांक : 13 JUL 2022

प्रति,

१. सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक
२. सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सहा.कुलसचिव व समकक्ष अधिकारी
३. सर्व प्रशासकीय विभागप्रमुख
४. मा. कुलगुरू, मा. प्र—कुलगुरू, मा. कुलसचिव, मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ व मा. वित्त व लेखा अधिकारी यांच्या कार्यालयास माहितीसाठी
५. इंटरनेट सेल — सदरचे परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

**टीप : सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व अधिकारी व प्रशासकीय सेवक यांच्या निदर्शनास आणावे.**